

The Modi Character

AND

ITS ORIGIN.

BY

B. A. GUPTE, F Z.S.,

Personal Assistant to the Director of Ethnography for India.



BOM

REFBK-0000324

'Y'S PRESS.

Price, As. 4.

प्रस्तावना.

इंडियन आंटिक्वेरी नांवाच्या मासिक पुस्तकांत मीं एक लेख लिहिला आहे (परिशिष्ट अ पहा) त्यांत मोडी लिपी शिवछत्रपतीच्या वेळीं प्रचारांत आली व तिचें जनकत्व बाळाजी आवजी चिटणीस यांजकडेस येतें असें इतिहासाच्या आधारानें दाखविलें आहे. हा लेख प्रसिद्ध करण्या पूर्वी तारीख २५ अक्टोबरच्या सयाजी विजयांत खालीं दिलेली जाहिरात मी आपल्या स्नेह्यांकडून देवविली होती:—

"श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांचे कारकिर्दीपूर्वीचे वेळची मोडीलिपींत लिहिलेली सनद, किंवा दुसरा सरकार दरबारचा लेख जो कोणी आणून दाखवील व त्याबद्दल इतिहासज्ञात्यांची (पांच गृहस्थांची कमेटी) खात्री करून देईल, त्यास रुपये २५ खालील सही करणार याजकडून बक्षिस मिळेल. एकापेक्षां अधिक गृहस्थांकडून खात्रीलायक लेख मिळाल्यास पहिल्यानें येईल त्यास बक्षिस मिळेल किंवा त्यांतून ज्याचा लेख जास्त खात्रीलायक ठरेल त्यास मिळेल."

कोणी जुना लेख न दाखविल्यामुळें, व सरकारी प्रकरण फार दिवस पडून राहिल्यामुळें, आखेर तसेंच प्रसिद्ध करणें भाग पडलें. ह्याजवर रा. रा. गद्रे यांनीं पत्रदर्शनीच कोधाच्या आवेशांत तारीख २५ मे १९०५ च्या इंदुप्रकाशांत एक पत्र छापलें आहे. त्यांत श्रीमंत पेशव्यांनीं बिवलकरी वळण सुरु करितानां आपलें श्रेष्ठत्व राखलें अशा अर्थाचा माझा लेख आहे त्याजवर रागावल्यासारखें दाखविलें आहे; व बाळाजी आवजी ह्या

'कीर्तिवान या पदास लायक' कामदारास मोडी लिपीचें जनकत्व दिलें त्यास पुरावा अपुरा आहे असें सुचविलें, आणि शिव छत्रपतीच्या पूर्वीचे मोडी लेख मजजवळ आहेत असें लिहिलें. सन १४७५ चा एक लेख सरस्वति मंदिरांत प्रसिद्ध झाला आहे, तो पाहण्याविषयीं सिफारस केली. हें पत्र पाहतांच रा. गद्रे यांस मीही एक पत्र लिहिलें कीं आपल्या जवळील कागद पत्र पाहण्यास पाठवावें व आपण खात्री ठेवावी कीं जास्ती पुरावा मिळाल्यास तो आपल्या दोघांच्या सहीनें इंडियन् आंटिक्वेरी मध्येंच मी सरकारी नात्यानें प्रसिद्ध करीन. इतक्यावर मी स्वस्थ राहिलों नाहीं. चहूंकडे पुनः एक वार पत्रें पाठविलीं. सरस्वति मंदिराचा अंक आणविला, आणि माझ्या सर्व स्नेह्यांस विनयपूर्वक सुचविलें कीं आपल्यास खरा इतिहास शोधून काढणें आहे, सबब पक्षपात न करतां श्री शिवछत्रपतीच्या पूर्वीचा लेख मिळाल्यास बेशक पाठवावा. त्यावर पुष्कळ तपास करतां कोठेंच पत्ता लागेना, आखेर श्रीक्षेत्र नाशीक येथील तीर्थ उपाध्यायांच्या वह्या शोधण्याविषयीं सूचना करून मुंबई एज्युकेशन डिपार्टमेंट मार्फत मोडी अक्षर ज्यांत आहे अशी जुन्यांत जुनी एक वही मिळविली. तिचा नंबर पांचवा आहे. पूर्वीच्या ४वह्यांत मोडी लेखच नाहीं हें यावरून उघड आहे. ही वही वे. गिरीधर उर्फ गिरीभट क्षेमकल्याणी यांची आहे. तींतील एकंदर सर्व मोडीलेख उतरून घेऊन हल्लीं प्रसिद्ध करीत आहें. मोडीलेख एकंदर ८५ आहेत, तर त्यांत फक्त प्रभुजातीचेच ८० आहेत. इतर जातींचे लेख पुष्कळच असून ते बाळबोध, रांगडी, गुजराथी, कायथी, फारसी, मारवाडी व मूर्वी (मौर्वी, मौर्यकुळाची) इतक्या लिपींत आहेत. त्यांत महाराष्ट्र ब्राह्मण, सोनार, मराठे, रजपूत, कनोजी (ब्राह्मण), कायस्थ श्री वास्तव (श्रीवत्स), पांडे (ब्राह्मण), ठाकूर, अहीर, सनोदिया ब्राह्मण, लोधा, रजपूत, वैश्य, नवार (नेवार), भाट, चंदेले-रजपूत, नाऊ (न्हावी), दरजी (शिंपी), कुलथी (?), सोनी (गुजराथी सोनार)

श्रीगोड मालवी ब्राह्मण, नाकवा (नाखवा ?), लाडवाणी, पोरवाळ वाणी, अगरवाळ वार्णी, तेली, कपोल वाणी, खत्री, जाट, घासी, भाटीया, इत्यादि पुष्कळच जातीचे लेख आहेत. वरील फेरिस्त फक्त पहिल्या वीस पानांतलें आहे. तेव्हां सर्व जातींची यादी देऊन वाचकांस कंटाळा आणीत नाहीं. सांगणें इतकेंच कीं, ही वही एक पक्षीय नाहीं. सर्व जातींस लागू आहे. तेव्हां तींत मोडी लिपी लिहिणारे प्रभूच जास्ती असणें हें लक्षांत ठेवण्या-सारखें आहे. याच जातींत मोडी लिपीची उत्पत्ति झाल्यामुळें व कारकुनीचा धंदा मुख्यत्वें त्यांचाच असल्यामुळें असा प्रकार साहजीक घडला–असो. आधारवत् सांपडलेल्या पवित्र जनस्थानांतील जुन्यांत जुन्या चोपडींत जे मोडी लेख सांपडले त्यांतही जुन्यांत जुन्या लेखाचा शक १५६५ आहे. नं० ५१ चा लेख जसा आहे तसाच या पुस्तकाच्या आरंभी दिला आहे. आज १८२७ शक चालू आहे त्यावरून सुमारें २६२ वर्षां पूर्वीचा हा लेख ठरतो म्हणजे इसवी सन १६४३ चा आदमास येतो, तेव्हां शिव छत्रपतींचा छाप मोडी लिपीवर बसला किंवा नाहीं हें निस्पृह वाच-कांच्या लक्षांत येईल. न्या. रानडे यांनीं आपल्या सर्वमान्य ग्रंथांत शिवछ-त्रपतीचा अवतार झाला त्या वेळच्या लोकस्थितीचें वर्णन दिलें आहे. त्यांत, रामदास, तुकोबा, इत्यादि कवी व साधू यांस कसें भरतें आलें होतें, याचें सुरेख वर्णन दिलें आहे. त्या भरतीचा विचार करतां कारकुनी पेशाच्या आदिस्थानीं विराजमान असलेले राजकारणपटु, खरे सूत्रधार बाळाजी आवजी यांनीं आपल्या बुद्धिकौशल्यानें मोडी लिपी शोधून काढली असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. श्रीमंत पेशवे यांच्या संबंधानें जितकें थोडें लिहिणें, तितकेंच मी लिहिलें आहे, तत्रापि रा. गद्रे यांस रा. ब. गोपाळराव हरी देशमूख यांनीं नमूद केलेली २०० विद्यार्थ्यांची हकीकत मीं आपल्या पत्रांत सुचविली,

त्यावरून त्यांची खात्री झाली असावी असें मला वाटतें, कारण त्यांहीं प्रत्युत्तर दिलें नाहीं. प्रथम दर्शनीं राग आला तरी तो वृथाभिमानाचा आहे असें लक्षांत येतांच विचारी माणूस असेंच करणार, व तेंच त्यास भूषण आहे. श्रीमंतांबद्दल लेख लिहिणें मलाही बरें वाटलें नाहीं पण, इतिहास लिहितांना साखळेची मधली कडी मुळींच गाळतां येत नाहीं, आणि राज्यकर्तें आपलें वर्चस्व सर्व ठिकाणीं ठेवतात, त्यांत मोठा गुन्हा ही नाहीं.

आतां राहिलें सरस्वति मंदिरांतील पत्र, त्याचा तपास करतां मूळ खलिता फारशी लिपींत असून त्याची लेखनसीमा मोहरबंद झाल्यावर खालीं भाषांतर आहे, तें मात्र मोडी लिपींत आहे. सिमल्यांतील मुख्य दप्तरांतील (मुनशी खान्यांतील) फारसी भाषा प्रवीण स्वदेशी कामदार यांस तें दाखवितां त्यांचें म्हणणें पडलें कीं, दुभाषी खलिता आमच्या पाहण्यांत आला नाहीं, व लेखनसीमेच्या खालील मजकूर कोणी तरी फारशी जाणणाऱ्या कामदारानें मागाहून लिहिला असावा. कागद व शाई एकच आहे हें जाणण्यास छापील नकले वरून साधन नाहीं. तरी कागद अर्धा फाडण्याची वहिवाट नसे, त्यामुळें मागाहून पुष्कळ वर्षांनीं भाषांतर लिहितां येणार आहे. तेव्हां शके १३९६ चा निराधार पुरावा फिका पडतो.

या प्रमाणें आजपर्यंत लागलेल्या शोधावरून व वे. क्षेमकल्याणी नाशीककर य च्या ऐतिहासिक लेख निरूपणावरून श्री शिवछत्रपतीसच मोडी लिपी प्रचारांत आणविण्याचें श्रेय देऊन हा लेख पुरा करतों. पुढें आणखी पुरावा कोणास मिळेल तर तो निरपेक्ष बुद्धीनें सर्वांनीं मान्य करावा हीच विनंति.

माझ्या हयातींत शोध न लागला, तरी पुढें शोध करणारास माझीं साधनें उपयोगीं पडोत.

पण, कलम ठेवण्या पूर्वी आणखी एक कल्पना सुचली आहे ती ही नमूद करतों. माझ्या सरकारी कामांत जातीच्या नांवांत बदल, उपनांवांत बदल, व्यक्तिमात्रांच्या नांवांत बदल, यांची मोठी गर्दी असते. आज "सत्शूद्र" तर उद्यां माहिष्य;" आज "तांबट" तर उद्यां "त्वष्टा"; आज 'पांचकळशी' तर उद्यां "ब्रह्मक्षत्रिय," असल्या फरकांचीं मला टिपणें ठेवावीं लागतात, त्याचा विचार करीत असतां, **प्रभु हे प्रभूच** नांव धरून आहेत, त्यांचा ऐतिहासिक धंदा कायस्थ, अथवा सरकारदरबारीं लहान मोठे अधिकार हा-ही कायम आहे, पण उपनांवांत फरक पडलेला एक दोन स्थळीं दिसतो, अधिकार परत्वें घेतलेलीं दरकीं आडनांवें प्रचारांत असणें साहजिक आहे. **संस्कृत** ग्रंथांत आढळणाऱ्या जुन्या वेड्याविद्या उपनांवांस गाळणें हें ही साहजिक आहे. तो चमत्कार सोबतच्या टिपणांत दिसून येईल.

दुसरें. **इंग्लंडांतील चॉसर**ची भाषापद्धति व **सर टॉमस मन्रो**ची लेखन शुद्धि जशीच्या तशीच छापली जात आहे. त्या प्रमाणें आमच्या माहाराष्ट्र मायभाषेची पूर्व-पीठिकाही सदर टिपणांत दिसत आहे, या खेरीज आपल्या पूर्वजांचीं वसतिस्थानें, व त्यांचे हुद्दे याच टिपणांवरून कळून येतात, आणि आखेर त्या पूर्वजांचे हस्तलेख पाहण्याची उत्कठ इच्छा उत्पन्न होते, सबब लेखांतील वेचे वाचतांनां **वे. क्षेमकल्याणी नाशीकर** तीर्थोपाध्याय यांचे वाचकजन आभार मानतील अशी उमेद आहे.

सिमला २६-१०-०५

ताजाकलम—हा लेख छापखान्यांत गेल्यावर विविधज्ञानविस्तारांत रा. राजाराम शास्त्री भागवत यांची टिका आली आहे, पण तिचा जोर व्यक्तिविषयकच ज्यास्ती असल्यामुळें जबाब [ड] परिसिष्टांत दिला आहे.

वा. आ. गुप्ते.



नाशीक येथील तीर्थ उपाध्याय क्षेमकल्याणी यांचो जुन्यांत जुनी वही नं. ५

(मोडी लेख)

(१) नरसोजी कुकाजी प्रभु, आजे सुंदर प्रभु, बंधु श्रीरंग नारायण शिवाजी प्रभु, वाठारकर देवनेर येथील (रहाणार) उपाध्ये गिरमाजी भट क्षेमकल्याणी नासीक [क] र हे आपले उपाध्ये. (पान १३)

(२) यादो (यादव) गोविंद, आजे रंगाजी प्रभु कल्याणकर. आपण नासिक यात्रेस आलों. तीर्थरूप विठल रंगनाथ ह्यांचें लिहिलें देखोन शके १५८१ देखोन आपण तुम्हांस तीर्थ उपाध्येपण दिधलें असे. आणखी कोणी ब्राह्मणास लेखन दिधलें असे, तें रद्द असे. सई--१६१४ माघ शुद्ध दशमी, मुक्काम. नाशिक [२ पहा नं. ३]

शेरा—यादो गोविंद प्रभु कल्याणकर प्रधान (पान १४).

(३) लिखितं विठल रंगनाथ प्रभु, भाऊ गोविंदजी व कृष्णाजी प्रभु गुप्ते कल्याणकर. शके १५८१ विकारी नाव संवत्छरे माहे 'त छी (sic) दशमी सोमवार मु ॥ त्रिंबक, नाशिकचे तीर्थ पुरोहित गिरिभट क्षेमकल्याणी जे आपले वंशीचे येतील ते तुम्हांस मानतील. कल्याणकर.

(पान) १४ [येथें नंबर २ यादो गोविंद यांच्या हातचा कृणाजीपंत यजुर्वेदी यांजकरितां लिहिलेला लेख मोडी आहे. पान २७ यांत शंकराजी पंत गुमास्ते यांचा शके १५८२ तला लेख बाळबोध असून त्याचीच मोडींत नक्कल आहे].

(४) से ॥ मुरारजी तान प्रभु गुप्ते चेऊलकर. बाबाजी रंगनाथ, पोसजी नारायण, गोविंद नारायण, माहादाजी नारायण, रामाजी नारायण, चेऊल-

कर, गुप्ते. जे कोणी आपलें वंशीचे येईल ते ..... आपले उपाध्ये आहेत त्यांस मानदे ॥ सके १६०८ (?) क्षेम नाव संवत्सरे. आखाडी शुद्ध त्रोदशी बुधवार मु ॥ नाशीक.

१. मालजि सांगाते. हिरोजीचे पुत्र अडनाव वाघ. मल्हाटे.

१. वछ सेट पिता सोन सेट पुत्र त्रंबक सेट गापाजी सेट सखोजी वानी भोपतराय. साहापूर.

१. अनंत सेठ विठल सेट. रघुजी पिता सुडक सेट वानी वैस साहापुरकर. [पान ४०]

इतका लेख बाळबोधींत आहे.

(५) शके १६६४ दुंधभी नाम संवत्सरे मार्गशीर्ष वद्य आष्टमी भौम्य वासर ते दिनी लिखिते. दौलतराव रामाजी. आजे कोंडाजी प्रभु देशकुळकर्णी ता ॥ मोसेखोरे. आपण नाशीकीं यात्रेस आलों, त्यास वडिलींचें पत्र देखोन तीर्थ उपाध्ये पण देवभट क्षेम कल्याणी नासीक (क) र यासि दिलें असे. जो कोण्ही आमचे वंशीचा असल, त्यानीं यांसी तीर्थपुरोहित मान्य करून पुजणें. (सई फारशी) [पान ४२]

(६) लिखित. रघोजी केबाजी प्रभु भीवंडकर, बाप केबाजी आजो रामाजी ष्या...फु उ ल क (ला ?) दे (हे ?) आपण नाशीक यात्रेशीं आलों. वेदमूर्तीं देऊभट खेमकल्यानी यांस तीर्थ उपाधेपण दिधलें असे. जो कोण ही आपली या वंशीचा येईल तो तुम्हांस मानील— (पान ४३)

(७) स ॥ १६०२ रुद्र नाम संवत्सर कार्तीक सुध ५ रुद्राजी दाद प्रभु आजे रुद्राजी मुधाजी चौबळ भिवंडीकर. आपण नासीक यात्रेस आलों तें

समई वेदमूर्त गिरिभट क्षेमकल्याणी यांस वडीलीं लिहिले प्रमाणे तीर्थ उपाध्यपण दिधलें असे.

बाबाजी चोवळ वस्ती भिवंडीकर नाशीकचे तीर्थ उपाध्ये गिरिभट क्षेमकल्याण.	दत्ताजी तुकोजी प्रभु चौबळ भिवंडीकर नाशीकचे तीर्थ उपाध्ये गीरीमट क्षेमकल्याण.

वडिलांचें दसकत देखोन आपण लिहिलें असे.

भिवाजी रुद्र, आजे यायाजी रुद्र, पणजे मुधाजी बाघड नरहर रुद्र, पुतणे माहादाजी नवाजी व संभाजी बाबाजी व बचाजी व यादवजी चौबळ भिवंडीकर. नाशीकचे उपाध्ये देवभट खमकल्याणी वडिलांचें. (पान ४४)

(८) लिखितं त्रींबक शेंकर हवालदार, भाऊ रखमाजी शेंकर तांबडे (हें तांबे याचें पूर्व रूप काय?) अष्टमीकर नाशीकचे तीर्थ पुरहित गीरीभट क्षेमकल्याणी. जे आपले वंशीचे येईल ते तुम्हांस मानतील. (हें अक्षर सुरेख व मोठें वळणदार चिटनिसी आहे. (पान ४४)

(९) शके १६०० विधार्थीनाम संवत्सरे, जेष्ठ वद्द त्रीतिया, ते दिनीं वेदमूर्तीं राजश्री गिरीभट क्षेमकल्याणी तीर्थ उपाधे नाशीक यासी रामाजी कांऊजी देशकुळकर्णीं ताा मोषेखोरे दीही. आपले तीर्थींचें उपाध्यपण लेहोन दिलें असे. जे कोण्ही आपले वंशीचे येतील तीहीं यास मान्य करावें. नामावळी मल्हार प्रभु, आजे कांऊजी प्रभु, पिते बावाजी मल्हार, चुलते कृष्णाजी मल्हार चुलते बंधुजी मल्हार, चुलते बंधूजी नावे–महादाजी बाबाजी शंकराजी बाबाजी जनाजी काऊजी, त्रिंबकजी, ...हरी, कृष्णा, या विरहीत ही जेष्ठ कनिष्ट जे आहेती तीही सकळीं मान्य करावें.

मोर्तब सुद

सजनाजी बाबाजी वास पा-ल-ह-व-न-व चेऊलकर. नाशीकचे उपाध्ये गीरीभट क्षेमकल्याणी. जो येईल आपले वंशीचे. ते यासी पुजणे. [पान ४५].

(सजनाजी सोबत कारकून असावा उपाध्यानें पुढें 'प्रभु' असा शब्द बाळबोधींत दिला आहे.

(१०) वेदमुर्ती गिरीभट खेमकल्याणी यासी सेवक बाळाजी राम, आजे केदारजी प्रभु, बंधू केवाजी प्रभु कास्त उलकुंदे न्याहार राऊ वास्तव्य भिवंडी. आपण नाशीक यात्रेशीं आलों ते समई तुम्हांस तीर्थ उपाधेपण लेहून दिधलें असे. जे कोण्ही आपले वंशीचे येईल, ते तुम्हांस मान्य करतील. साा १६६ (१६०६) र-क-ता-दी नाम संवत्सरे, कार्तीक सूद ५ पंचमी. (पान ४५).

(११) संवत १७१६ माघ शुद्ध पंचमी गुरुवासरे वेदमूर्ती गिरीभट क्षेमकल्याणी नाशीक(क)र यासी तीर्थ उपाध्येपण लेहून दिधलें. गवाजी कान्होजी आजे जसजी (उत्तरे कडील 'जस' आझून 'यश' स्थानीं वापरीत असत असें दिसतें.) प्रभु नवतालकर (हे आमचे पाठारे प्रभु **नवलकर** काय ?) गोत्र जमदग्न, गांव वाडोळकर. आपले वौंशीचे जे कोण्ही येईल ते तुम्हांस मानील, हें लिहिलें. सही. (पान ५१)

पान ५७ यांत शके १६९५ सौम्य नाम संवत्छरे कार्तीक सूध ५ ते दिवशीं राजश्री संवाजी राजे माऊजी राजाचि पुत्र. पुत्र सुभानजी राजे आडनांव बांकेराव रत्नापूरकर सरकार इ. मोडी लेख आहे, हस्ते त्रिंबक जानार्दन दिवाण.

(१२) संवत्छरे शके १७१६ आशाढ वद्ये पंचमी लिखितं. नरहर परेशराम प्रभु वकील देशमुखाचें. दुसरें उपनांव खाटीक भीवंडीकर,

नाशीक तीर्थउपाध्ये वेदमूर्तीं राजश्री सिवभट क्षेमकल्याणें आपले वौंशी यात्रेस येतील ते तुम्हांस मानितील (पान ५९)

[याच पानांत आपाजी नाईक यजुर्वेदी यांचा शके १६०७ चा मोडी लेख आहे.]

(१३) शके १५९८ नळनाम संवत्सरे माघ शु॥ ५। दे दिवसि. राजश्री गीरीभट उध्येपण दिल्हे. शंकराजी मल्हार, आजे भायाजी गोविंद प्रभु, बंधु भायाजी रामाजी बाबाजी चुलते गोविंद जीचे पुत्र येकनाथ सीवाजी जनाजी प्रभु करणीक तर्फ आष्टमी हे लेहिले सहि ॥

(पान ६१) [हे अक्षर बाळबोध पण वळणदार आहे.]

(१४) राजश्री वेदमूर्तीं गीरीभट क्षेमकल्याणी नाशीकचे तीर्थ उपाध्ये. सूर्याजी राम वडील बंधु आबजीराम, गोविंदराम प्रभु, वस्ती उंबरडें ता॥ पेण. जे कोण्ही आपले वंशीचे तीर्थास येतील ते यांसी मानीत गेलें पाहिजे. गोविंदराम हें लीहीवलें, आमचे पुत्र रामाजी व सोनाजी व निळाजी व रायाजी. (पान ६२)

[उपाध्ये खालीं बाळबोध लिहितात त्यांत. अडनांव राजे, वास उंबरडे तपा (टप्पा) पेन-कुळकरणी उंबरेठाचें—असा शेरा मारला आहे.]

[याच लेखा खालीं]

रामाजी गोविंद बंधु सोनाजी व निळाजी व रायाजी गोविंद वास कुळकर्णी मौजे उंबरडें उपनांव राजे कायस्थ- कुल- प्रभु. आपले उपाध्ये गिरीभट क्षेमकल्याणी–(पान ७२)

(१५) लिखीतं नारायण गंबाजी भाऊ दामाजी प्रभु बाळखांवकर. नाशीकचे पुरहित गीरीभट क्षेमकल्याणी जे आपले वौंशीचे येतील ते तुह्मांस मानतील.

(पान ६३) [अक्षर वळणदार पण " घा " व " बा " आणि " बा " व " दा " या मोडी अक्षरांतील भेदाभेद या वेळीं ठरला नसावा.]पान ६४ लक्ष्मणपंत वेदरकर रातिव्य यांचा बिनतारखी लेख आहे.

(१६) शके १६१७ ईवा (?) नाम संवत्सरे आश्वीन वदे पंचमी मंगळ्वार ते दिनी खत लिखिते भीवाजी सखाजी अधिकारी तर्फ देऊ पेतपे मुरबाड. आजे सोन प्रभु पणजे कृष्णाजी प्रभु. आपले बंधु शामजी. चुलत बंधु रायाजी, हरवाजी, व केशवजी, व तुकोजी, गोमाजी,व माधवजी गोवप्रभु व महिपाजी बाळाजी लिहोन दिधले ऐसेजे, आपले तिर्थ उपाध्ये गीरीभट खेमकल्याणी याप्रति लिहोन दिधले असे, आपले वडील यात्रेस आले होते त्यांचे लिहिले जरी कोठें निघल तरी ते मान्य असे. नाहीतरी स्वामीस लिहोन दिधले असे ते खरे असे. आपले वंशीचा जो कोण्ही येईल त्यानीं स्वामीचे तेथें राहावें. हस्ताक्षर भिवाजी सखाजी. [पान ६६]

[या लेखा खालीं पुरोहिताचा बाळबोध शेरा आहे त्यांत:—

(१७) सोइराबाई बाळाजी सोनप्रभु, आजे नार प्रभु. पुतनें (sic) बाबाजी, चिमणाजी, तुकाजी तानाजीचे पुत्र कास्त वास मानगांव (sic) प्र० त-प-वे रे डी महमदापुर सु० कल्याणकर असा कोणातरी मोडी लिहितां न येणाऱ्या स्त्री बद्दल लेख आहे.] [पान ६६.]

(१८) अत्माजी पदमाजी देशकुळकरणी पा दिवें. नाशीकचे उपाध्ये गिरीभट क्षेमकल्याणी.

[याच्या खाली पुरोहित बालबोधींत लिहितात:—

आत्माजी पदामाजीचे पुत्र. आजे आपाजी. भाऊ दामाजी प्रभु कास्त कुळकरणी, वास, दिवेकर.] (पान ७०).

(१९)

श्री. गो. ब्रा.

शके १५७८ माघ शुध ५ ते दिवशीं वेदमूर्ती राजश्री विसभट क्षेमकल्याण नासीककर यांसि विद्यार्थी मदनाजी शंकर, आजे

अंताजी प्रभु कायेस्थ तुंगारीये राजापुरकर लिहून दिधले ऐसाजे, आपण तीर्थराज येथें यात्रेसी येऊन तुम्हांस आपले उपाध्येपण दिधलें असे. जो कोण्ही आपले वंशीं येईल तो तुम्हांस मानील. (पान ७३.)

(२०) सके १५७८ लिखितं. वेदमूर्ती गीरीभट नाशिकर क्षेमकल्याणी हीराजी व जिवाजी व सूपाजी प्रभु पाठारे वास माहीम.—कळावे जो आपले उवंष्य (sic) येतील ते तुम्हांस मानतील (पान ७३).

(२१) प्रभु माहाडच—चिठि खत. कुकाजी प्रभु धर्माजी प्रभुचे पुत्र= पुत्र बाळप्रभु, गणेश प्रभु जाती प्रभु, वासी महाड, (हा लेख बाळबोधींत आहे पण पुढें ब्राह्मन (sic) रुगवेदी रुद्रभट तटु माहादेव भटाचे पुत्र. नानाजी प्रभु संगाते आले होते, दुसरा संभाजी प्रभु होता

हा वरील लेखकाचाच शेरा आहे. तेव्हां सर्वच लेख सदर ब्राह्मणाचा असावा, (पान ७४).

(२२) श्री स्वस्तिश्री शके १५९० की-ळ-क (sic) संवछरे चैत्र सुध दित्तीया बुधवार ते दिनीं राजेश्री गिरीभट 'पोटक' (sic) वास्तव्ये नाषीक स्वामी याशी नानाजी गोविंद प्रभु कुळ्कर्णी कानन खोरे ब्रह्म-व्यापार (sic) समंध हवाला खालापूर लेहोन दिधलें ऐसेजे आपण व आपले.....(?) याचे.....(?) होता यावर आद्यापचे तीर्थारूप होऊन तीर्थ विधीस पा—धी ... (?) उपरी आपले पुत्र व पुतणे व गोत्रज येतील ते तुमचे घरीं राहतील यास आनमानी होतील तरी तीर्थक्षेत्राची आण असे हे लिहिले सई- गीरीभट क्षेमकल्याणी तीर्थ उ० (पान ७४)

[पुरोहिताचा शेरा:— नानाजी पंत गोविदपंत प्रभुचे पुत्र कौंड प्रभुचे नातु-जाती प्रभु. विसाजी गोज प्रभु वासी कानन खोर परगना (Sic) रायेरी कानगो माता= दाजी गोपाल प्रभु संगात आले होते. प्रभु जाती — हा

शेरा पुरोहिताचा बालबोध आहे त्याच्याच खालीं पुनः त्याच मोडी अक्षरांत दुसरें टिपण आहे तें:—

स्वस्तिश्री शके १५९० कीलक सवत्छरे चैत्र सुध द्वितिया बुधवार ते दिनी वेदमूर्ती राजश्री गिरीभट पाठक क्षेमकल्याणी स्वामी यासि विद्यार्थी संभाजी बाजी प्रभु माहाडकर बा-त्व-व-या-पार सर-धनस सहर (?) लेहोन दिधले ऐसेजे आपल्या सह बंधू माता ऐसे यात्रेस आलों यावर स्वामी तीर्थगुरू होऊन तीर्थ विधी संपादिला. या उपरि आपले बंधु वडील त्रिंवकजी व शंकराजी व धाकटे माहादेव व आपले गोत्रज येतील ते तुमचे घरीं राहतील यास अनाथा री-खे (?) असे तरी श्रीची आण असे हें लिहिलें सई. [शेरा बालबोध संभाजीपंत प्रभु बाल प्रभुचे पुत्र. मुरारी प्रभुचे नातु १ त्रिंबकजी १ संक्राजी १ माहादेव प्रभु विटल प्रभु नारायेन प्रभु माता सावित्री गंगायी (?) जाती प्रभु वासी माहाड परगना (Sic) (पान ७४)

(२३) पान ७५ यांत शके १५८२ चा लीखित अंताजी प्रभु रंगनाथ प्रभुचे पुत्र=पुत्र बाळाजी प्रभु=मल्हारजी. पिलाजी प्रभु वासी माहाडचे कुळकरनी (sic) (पान ७५)

(येथें मोडी सई अंताजी रंगनाथ देसपांडे... अशी आहे.

१ शिवप्रभु———बदलापूरकर (बालबोध शेरा)

(२४) शके १५८२ वे-के-ब-दे-ध-री-मी- रविवार लीखितं गोपजी पंत प्रभु देउजी प्रभु घोसाळकर नासीक तीर्थपुरहीत सीऊ भट क्षेमकल्याण आमचे वंशीचे येईल ते तो सीऊ भटास मानणे (पान ७५)

शेरा—गोपजी पंत प्रभु देउजी प्रभुचे पुत्र, बाबाजी प्रभुचे नातु. पुत्र बालाजी प्रभु १ त्रिंबक पंत प्रभू स्यामजी प्रभु श्रीयाजी प्रभु गोमाजी प्रभु नातु बाबाजी सीवाजी सुरयाजी भाऊ जीजा-ती-ती प्रभु वासी तळेघोसाल भतीजे देउजी वामनाजी भला रीजी घोसाल. (हा लेख बाळबोध आहे.)

(२५) सके १५८२ वैशाख वद अष्टमी लिखतन. तुकाजी पंत प्रभु



साबाजी प्रभु अे-ना-उ- (?) भाऊ साबाजी व यंकोजी सो किले खेळल. नाशीकचे पुरहित विठल भट क्षेमकल्याणी. आमचे वंशाचे येतील त्याचे पुरहित त्यास मानणे [पान ७५]

बाळबोधशेरा—तुकोजी पंत प्रभु साबाजी प्रभु यंकोजी प्रभु श्रीयाजी प्रभुचे पुत्र साबाजी प्रभुचे नातू प्रभु न्यातीं वास चेऊलचे.

(२६) सके १५८२ वैशाख वदे आष्टमी आदीतवार लिखितं. मदनजी कमाजी रुद्राजी प्रभुचे नातू. नाशीकचे पुरोहीत शिवभट क्षेमकल्याणी. जे आमचे वंशज येईल वंद्य यांस करणे. [पान ७५]

बाळबोधशेरा—मदनजी पंत प्रभु कमाजी प्रभुचे पुत्र रुद्रप्रभुचे नातु कमाजी रामाजी प्रभुचे पुत्र भाऊ वासी तलेघोसालाचे (देसमुख माता गंगाबाई) (पान ७५).

(२७) बालबोध लेख. अक्षर वळींव.

सके १५९९ पींगळ नाम सवछरे पौश वद्य द्वादसी नींबाजी कृष्ण प्रभु ०॥ कायस्त जन्म भुमी घोंसाळे पुरातन स्थळ मरुड तर्फ राजपुरी चुलत ०॥ बंधु त्रींबक नाबाजी नासीकचे तीर्थ उपाध्ये गिरीभट क्षेमकल्याणी. ०॥ जे आपले वौसीचे येतील ते यास मान्ये. नीबाजीची माता रखमाई ०॥ माहेरचें नाम तान्हाई त्रींबकजीची बहीण बबाई व तीचा पुत्र ०॥ गोविंद. (पान ७६)

श्रीशंकर.

(२८) शके १६०८ क्षे नाम सवत्सरे जेष्ट वदे आष्टमी गुरुवासरे लिखिते. चिमणाजी हरी राजपूरकर येही वेदमुर्तीं राजश्री गिरीभट क्षेमकल्याण यास तीर्थचे उपाध्ये पण लिहून दिले असे. तरी जो कोणी आपले वौसीचा एईल तेणे यास मान दिला पाहिजे—आपले वौसीक. तान प्रभु आजे. हरी

प्रभु पिते. शंकराजी हरी जेष्ट बंधु. यात्रेस जाईल तेणे यास मान दिला पाहिजे.

बालबोधशेरा.—चिमणाजी हरी पंताचे पुत्र तानप्रभुचे नातु भाऊ संकराजी प्रभु वास दंडाराजपुरीचे (पान ७६)

(२९) स. १५८२ वैशाख अष्टमी ते दिवशीं. वेदमूर्त गीरीभट क्षमकल्याणी नासीकर (sic) स्वर्मीचे शेवशी भगवानजी विठोजी प्रभु देशपांड्ये परगणे इसलामाबाद.....भीवंडी तरफ मा-ध-...कुळकर्णी तर्फ हयबतगढ मजकूर तर्फ मजकूर लेहून दिधले ऐसीजे. नाशकामधें पुरातन तर्थ उपाधे आपले स्वामी आहेत. जो आपले वंषीचा येईल तो स्वामीस मानील.

बाळबोध शेरा—भगवानजी विठोजी प्रभु देशपांडीये व कुळराणि भीवंडीकर प्रभु कास्त. (पान ७६).

(३०) वेदमूर्तीं राजश्री शिवभट क्षेमकल्याणी नाशीकर स्वामीचे शेवेशी बाबाजी रघुनाथ प्रभु उपनाव रणदिवे गांव गोवाळें तळेकर देश कुळकर्णी आम्हीं यात्रेस आलों तें समई लेखन दिलें शके १५८२ वैशाख वदी ८ अष्टमी.

शेरा बाळबोध—दादाजी रघुनाथ रणदीवे तळेकर (पान ७७)

(३१) षके १५८२ वैशाक वदी अस्टमी ८ वेदमूर्तीं नाषीकचे तीर्थ उपाध्ये गीरीभट क्षेमकल्याणी लिखितं मोरोराम माहादजी भीक प्रभु बेंदरे वस्ती शाहाबाज कारणे. आपले वंषीचे येतील ते तुम्हांस मानितील हे लिहिले. सही.

शेरा बाळबोध–मोरोराम माहादाजी भीकप्रभु बेंदरे वासी–सा–स्याह बाजकर (पान ७७).

याच मोडी अक्षरां खालीं पुढील पोट लेख आहे. सक१५८२ वैशाक वद अस्टमी ८ वेदमुर्त गीरीभट क्षेमकल्याणी यास विचारथि हरी परेश प्रभु वकील वास्त भीवंडी तीर्थ उपाध्येपण लेहून दिधलें असें जे आपले उशीचे (sic) येईल ते तुम्हांस मान करतीलें.

शेरा—बाळबोध सिकजी नारायन (sic) प्रभू भिवंडीकर पाडें. (?) (पान ७७).

(३२) शके १५८२ वैशाख वद्ये पंचमी. सजणाजी पिते कोंडाजी आजे माहादो प्रभु कास्त चेऊलकर. आह्मांस नासीकचे तीर्थ उपाध्ये गीरीभट क्षेमकल्याण सईं (पान ७९).

(३३) सके १६०९ प्रभव संवत्सरे फालगूण वद प्रतीपदा लिखितं. भाऊ प्रभु लख प्रभु केशव देशपांडिये मामले इसलेमाबाद तर्फ भीवंडी व टिटवाळे नाषीकचे तीर्थ उपाधे रा. गीरीभट क्षेमकल्याणी.

बाळबोध शेरा. भाऊ प्रभु पीता लख प्रभु आजा केशव प्रभु पुत्र लख प्रभु आत्माजी रामाजी वास टिटवाळचे कुळकर्णी (पान ७९).

श्री.

(३४) शक १६२५ (७ ?) ई-वा- (?) नाम संवत्सरे. लिखिते तानाजी आपाजी देशापांडिये माहाले भिवंडी. यांचे पुत्र नागोजी व अदराजी. आह्मांस येऊन यात्रा रा. गीरी भट क्षेमकल्याणी यांचे विद्यमान केलेली असे. [पान ७९]

शेरा.—प्रभु देशपांडे वासी वासुंदरीचे.

(३५) श्री सकलतीर्थ स्वरूपें अखंडित लक्ष्मीपरी पुण्यें निराधारी यांसें आधार वेदमूर्ती राजमान्ये राजश्री शिवभट धोंडभट क्षेमकल्याणी स्वामी यास

आज्ञांकित जीवाजी आपाजी देशपांडिये मामले इस्लमाबाद तर्फ वासुंदरी दोन्ही कर जोडून श्री साष्टांग दंडवत विनंति उपरि. आपण अगर आपले वंशाचे जो कोण्ही क्षेत्र नाशिक त्रिंबक येईल तो स्वामीचे येथें येईल. पुरोहितपग स्वामींचें असे. आपले वास देशपांडिये मामले मजकूर

विसाजी व मुकुंदजी.
देशपांडिये.

लखोजी.
मल्हारजी व बाळाजी व
गबाजी देशपांडिये.

सवंत्सर विश्वावसू लिहिलें असे खुद ८ चतूर्थी सवंत्सर १५८७ [पान ७९]

शेरा–जीवाजी नानाजी आपाजी पंताचे पुत्र .
केसोजी प्रभुचे नाती जाती प्रभु वासी वासुंदरीचे देशपांडे काका.

१ विसाजी व मुकुंदजी १ लखजी व मल्हारजी. बालाजी गंधजी प्रभु वासी वासुंदरीचे देशपांडे प्रभु जाती. [पुनः मोडी]

लिखिते शंकराजी जीवाजी प्रभु आपले तीर्थ उपाध्ये गीरीभट खेमकल्याणी. (पान ७९)

(३६) शके १६०८ क्षे नाम संवत्सरे जेष्ट वद्य अष्टमी बुधवासरे लिखिते. सजगाजी गोविंद वैद्य बदलापूरकर येही वेदमूर्त राजश्री गिरिभट क्षेम कल्याण यास तीर्थवे उपाध्येपग लिहून दिधलें असे तरी जो कोणी आपले वंशाचा येईल तेणे यांस मान दिधला पाहिजे.
सिवाशी वैद्य अजे. कृष्णाजी वैद्य चुलते.

बंधु	पुत्र
१ बाळाजी.	१ गोविंद
१ मुकुंदजी.	१ त्रिंबक

शेऱ्यांत " वास बदलापूर कल्याण असें आहे. (पान ८०)

(३७) श्री शके १६१४ अंगिरा नाम छवच्छरे मार्गसीर मासे वद्यपक्षे ४ मंद वासरे लिखीतार्थ नारो मल्हार प्रभु आजे विसाजी प्रभु पडाजे कृष्णाजी प्रभु गडकरी कदिम वास्तव्य क-त-नौ-ली तो बनखल (?) हल्लीं वास्तव बदलापुर तो चौला (क ?) तीर्थ उपाध्ये वेदमूर्त राा गिरीभट क्षेमकल्याणी यास तीर्थ उपाध्ये पण आपले कुळाचे लेखन दिधले असे आपले कुळाचा भाऊ अगर आपला पुत्र अगर दुसरे कोण्ही कुळांतील यात्रेस येईल त्यान्हे यांचे येथें राहोन तीर्थ यात्रा करावी आपले कुळाचीं नावे:—

नावें:—

नानाजी सुर्याजी	रंगोजी मल्हार प्रभु.
चुलत बंधु आहे१.	कनिष्ट बंधु आहे१
त्रिंबक नारायण १.	आपला पुत्र चिरंजीव येंकोजी आहे १

यांतील जो येईल त्यान्ही तेथे राहावे.

नारो मल्हार प्रभु वीनाजी प्रभुचे नाती अडनांव गडकरी वास बदरापूर.

शेरा—बाबाजी रंगनाथ प्रभु बद्रापुरकर.

बालबोध शेरा :

अंताजी बापाजी प्रभु आजे रंगाजी प्रभु भाऊ चुलत भाऊ यादवजी गोविंद रायाजी दामोदर त्रंबकजी विठल प्रभु कास्त अड. गुप्ते वास बद्रापुर-कीनुळी (किन्हवली ?) कास गांव कोकण (पान ८१).

(३८) श्री शके १५९० (८० ?) कीलक छवछर चैत्र वदि त्रीहो दशी लिखिते. आपाजी सूर्य प्रभु वस्ती कास पो देव्हेर गो-र-ट. तिर्थ गुरु राजेश्री वेद मूर्ती गीरीभट क्षेमकल्याणी होणे. नासीक (क) र ह्याचे येथे राहोन तीर्थ करणे असे.

[शेरा] आपाजीपंत सुरयाजी प्रभुचे पुत्र. भीपती प्रभुचे नातु जाता प्रभु वासी कासगांव प्रगणे देहीर.

[त्याच्या खाली] बाळजी शिवप्रभु नासीकचे तीर्थ उपाध्ये गीरीभट (अक्षर मोडी पण, भिन्न आहे) (पान ८१)

(३९) नारो मल्हार प्रभु बदलापूरकर माता दीपाई तीर्थ उपाध्ये वेदमूर्ती गीरीभट.

[शेरा]-नारोमल्हार वी—ना—ऊी. माता दिपाई प्रभु वास बरदापूर पुत्र येंकोजी. त्रंबकजी महादेव निळकंठ सजगाजी प्रभु. पुतणे हरी व कान्होजी प्रभु.

बाळाजी शीव प्रभु वास कीन्हूली कांसगांवकर (पान ८१)

(४०) श्री सेवक .... गोविंद जनार्दन देशपांडे पा॥ करकंबस ... सुबा औरंगाबाद नाशीकचे उपाध्ये गीरीभट क्षेमकल्याण. तीर्थ उपाध्ये. [पान ८३]

[हा शेरा मोडी आहे, जात कळत नाहीं.]

(४१) कोंडाजी कांकदेव कुळकर्णी मौजे कठकंब पा॥ करकंब नासीकचे तीर्थ उपाध्ये गीरीभट क्षेमकल्याण (हाही शेरा त्याच गृहस्थाच्या हातचा मोडी आहे. आणखी तीन शेरे मोडींतच आहेत. [पान ८३]

बाळबोध शेऱ्यांत—"उजनी प्रगणा करकंब. प्रथम शाखा." अशी अक्षरें आहेत.

पुढें आणखी एक शेरा करकंबच्या नरसी भटाचा मोडींतच आहे.

नागोजी संभेराव याचा मोडी हस्तलेख येथें आहे पण जात समजत नाहीं, व तारीखही नाहीं. पान ८९ यांत मोडींत आबाजी नारायण रुग्वेदी ब्राह्मण यांचा शके १६६० कालाविगत नाम संवत्सरेचा लेख आहे.

(४२) सके १६०१ विधाथी नाम सवतछरे भाद्रपदे सुदे नवमी. वेदमूर्त गीरीभट क्षेमकल्याणी यांस विद्यारथी जीवाजी हरी आजे परस प्रभु वकील वास्तव भिवंडी. आम्ही नाशीक यात्रेस आलों ते समई तुम्हांस तीर्थ उपाध्यत्व लिहून दिलें व आपले पूर्वज हरी प्रभु यांचे लिहिले देखोन तुम्हांस मान्य केलें असे. (पान ९०).

328

(४३) श्री स्वस्ति शके १६०१ विर्धाथे नाम स्वस्थरे भाद्रपद सुद नवमी राजश्री कृष्णाजी तान प्रभु वैद्य ग्रामस्थळ कलिहाण. नासिकचे तीर्थ उपाध्ये राजश्री गीरभट क्षेमकलियाणी जे कोण्ही आपले येतील यांही ह्यास मान्य करावें हें लिहिले सई (पान ९२).

(४४) श्री स्वस्ति षके १५९९ पांगळ नाम छंवसरे पौष्य वद्य त्रयोदषी त्र (?) ये दिनीं वेदमूर्ती राजेश्री गीरीधर भट क्षेमकळ्याणी यास खजणाजी भाऊ प्रभु प्रधान वास्तवे बदरापूर. स्वामीस नाषीक तीर्थ पुरोहितपण आपले घरींचे आपले कुटुंबाचे ते हीं तुह्मांस मानावे. [पान ९२]

शेरा. सजणाजी भाऊ प्रभु प्रधान. भाऊ यादवजी वास बरदापुर.

(४५) गणेश भाऊ प्रभु ब-स-सु-र (?) तीर्थ उपाधे गिरीभट यास दिधले असे.

शेरा. बालबोध. गणेश भाऊदेव प्रभु चुलते वर्जोजी बाळाजी चींबकजी प्रभु गुप्ते वा० बरदापुरकर [पान ९१]

(पुढील लेख अर्धावट मोडी व बाळबोध आहे तसाच छापीत आहे.)

(४६) श्री त्रीघक श्री उघुनाथ णकव णरण वदृष्ट

परोघापी णत्र जॅरो वेसा खए व द प च मी की दीते नारो श्री गोविंद प्रभु व...सी प्रगणे घोसाळकर नाणीक उतीष (तीर्थ?) णोपाघगीरी भट क्षेमकळेनी पीजती [पान ९१]

शेरा.—नारोजी गोविंद प्रभु वासी तळे घोसाळकर.

(४७) आजाई पुत्र रामशा हमघण प्रभु वसती चेउष्ठ घे उघीष्टें तें मन्ने छळे. [पान ९१]

१ आजाई भरतार लक्षमण प्रभु पुत्र रामाजी वास चेऊल.

व पुताई बाई पुत्र कमाजीराम देसाई प्रभु वासी तळेघोसाळ नासीकचे गुरु गीरीभट.

१ आका बाई पुत्र दामाजी प्रभु रंगाजीचे पुत्र वासी मरुडकर तर्फ दंडाराजपुर.

१ बरवाई बाइ पुत्र रामाजी माहादेव प्रभु वासी चेउलकर.

१ गोदावरी बाई पुत्र भाउजी गनेस प्रभु वासी चेउलकर नासीकचे गुरु गीरीभट. (खाली सई बालबोध आहे) आजाइबा. (पान ९१)

(४८) रामाजी लक्षेमण प्रभु चेउलकर. तीर्थ उपाधे गीरभट क्षेमकल्याणी नासीक (क) र यांस मातुश्री आ-जा-ई बाई याही लेहून दिधले वेदमूर्त त्रीबंक भट थ्यु-क-ळ (?) याहीं व स्वामीनें संशय न घेणे-शके १६०८ नाव क्षेयेनाम सवस्तरे. (पान ९२)

(हे लेखक ४९ यातील आजाईचे चिरंजिव असावे).

(४९) रंगाजी केशव आजे कान प्रभु कोरडे कल्याण कर नाशकीं आलों तेव्हां लेहून दिधलें. शंवशर भो—व— (?) नावें शंवशर जेष्ट मास नव-मी सुध हे नाम. आपले व आपले तीर्थरूप व आजे यांचे नाव कोण्हीकडे असेल ते खरे. कोण्हीकडे नसेल तर हे लिहिले आहे. हेच तीर्थ उपाधे गीरीभट क्षेमकल्याणी [पान ९२].

शेरा-रंगाजी केशव आजे कान प्रभु बंधु गणेशजी व महादेव प्रभु अडनाव कोरडे वास्ती कल्याणकर शके १५९६ माघ शुध पंचमी.

(५०) गणेश केशव आजे कान प्रभु कोरडे कल्याणकर व माहदाजी बंधु व पुतण्या रंगाजी मूल केशव रंगाजी कोरडे कल्याणकर नासीकीं आलों तेव्हां आपले बंधूचे लिहिले देखिले त्यावरून तुम्हांस आपण लेहून दिधले शंवतसर विकारी नाम कार्तिक सुध द्वीतिया शके १६४१. [पान ९४]

(५१) **लिखितं पुतळाजी प्रभु घालखांबकर. नाशीकचे तीर्थ**

पुरहित वेदमूर्ती राजश्री गिरीभट क्षेमकल्याणी. जे आपले वंशीचे येईल ते तुम्हांस मानतील सके १५६५ चित्रभान नाम सवछरे.

माघ सुध नवमी सोमवार. [पान ९२]

शेरा—पुतलाजी प्रभु बा-ळ षीकर (?)

(५२) गंगाधर बाळाजी गोविंद देसपांडे पा॥ करकंब.

भाऊ	पुत्र
१ भीमाजी	त्रिबकराऊ
१ उमाजी	भिवाराऊ
१ पुरशोतम	वेंकटराऊ.
१ येशवंतराऊ	

नाशकि क्षेत्रीं उपादे देवभट क्षेमकल्याणी आपले तीर्थ पुरोहितपण वडिलीं त्यांस दिले असे ते आपण मान्य केले असे. (पान ९३)

शेरा-" ब्राह्मण ऋग्वेदी देशपांडे " इ०.

(५३) [हा लेख मोडींत पण जानोजी देश मूख दळवी लखमापूर कर असा पता असल्या मुळें जात कळत नाहीं तारीख नाहीं] [पान ९५]

(५४) शके १५५८ कार्तीक सुध पंचमी ते दिनें लिखितें बलाळ तान्हाजी प्रभु सिणघारपूरनें वास्तव्य पनवेली. आपण यात्रेस आलों ते समई वेदमूर्ती राजश्री शिवभट क्षेमकल्याण यांस तीर्थ उपाधेपण लेहून दिल्हे असे. पुढें जो आपले वौंशीचा यात्रेस येईल तो तुम्हांस पुजील हें लेहून दिल्हें सई शेरा—बलोळ तानाजी प्रभु कास्त.

श्रीधारपुर ले— — — — पनवेलेंकर— [पान ९६]

(५५) हा लेख १५९६ तला असून गोविंद वाडेकर याचा आहे. जात कळत नाहीं. [पान ९६]

